विश्वास

कोणत्याही नात्यात मग ते मैत्री असो अथवा रक्ताचे नाते असो, परस्परांप्रति कायम ठेवलेला आणि वृद्धिंगत होत गेलेला दृढ विश्वास हा कालानुरूप त्या नात्यातील अतुटता, अधिक आश्वस्त, व्यापक आणि समर्पित करत असतो.

काही मैत्रीच्या उदाहरणात हा विश्वास अगदी प्रकर्षाने जाणवतो, पैसे, व्यवहार, हिशोब, आवड-निवड, मान-अपमान, रुची, ग्राह्यता, समज, त्याग या सर्वांच्या पलीकडे असा विश्वास पोचलेला असतो.

एकाने दुसऱ्याच्या बाबतीत केलेली ती फक्त काळजी, संरक्षण, लक्ष देणं, जपणूक, अथवा एक भक्कम आधार इतकंच नसत, जमेल तितक्या सर्व बाजूनी केलेली तडजोड आणि आपलेपणाची साठवण असत. प्रसंगी स्वतःच झालेलं नुकसान, स्वतःच्या सुखाच्या किंवा आरामाच्या गोष्टींना देखील दुर्लक्षित करून, बाजूला सारून त्या नात्याभोवती गुंफलेले उबदार आवरण असत.

कुणीतरी आपल्या पाठीशी अगदी खंबीर आहे, आपल्या नकळत आपल्याला सतत जपतंय, प्रसंगी स्वतः मानसिक त्रास सोसून, समोरच्याच्या अडचणी, संभाव्य धोके यांची गोळाबेरीज करून त्यांना परस्पर उत्कटतेने भाग देतंय व अडचणींची बाकी कमीत कमी करतंय. कुठे तरी त्याला/तिला दोन्ही बाजूंना हे जाणवत असत की या जगाच्या बव्हंशी स्वार्थी गर्दीत आपण ज्याच्या करिता करतोय तो/ती देखील अपल्याइतकीच निर्भेळ, निस्वार्थी, प्रामाणिक आणि विश्वासू आहे, भले इतर लोक त्यात भेद पाडायचा प्रयत्न करतील, पण या नात्याची वीण मुळातच, काही मिळावं या तत्वांवर बांधलीच गेलेली नसते, म्हणूनच ती इतकी लेचीपेची नसते की कुणी काही म्हणल्याने अथवा काही गैरसमाजने ती तुटेल.

ते एक सात्विक समर्पण असत, ज्यात केवळ त्या विश्वासाच्या समर्पणात, आल्हाददायक हिंदोळत झुलत आपल्या सुख दुःखाच्या टप्प्यांवरून पुढे वाटचाल करत रहायच असत. कसं आश्वासक आणि अमूल्य असत ना असं जगणं.

अस कोणीतरी आपल्या आयुष्यात असणं हेच त्या परपसर वृद्धिंगत झालेल्या विश्वासच सार्थ रूप "मैत्र" असत. कुणाच्या आयुष्यातील अशा मैत्रीला कुणाची दृष्ट न लागो व ते मैत्र असच मोहरत बहरत वाढत जावो.

© सपु

www.saarthbodh.com